## महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड

## (नागपूर मेट्रो रेल प्रकल्प )

# कामठी रोडवरील 400 व 132 केव्ही ईएचव्ही लाईन्ससाठी उंची वाढवण्याचे काम पूर्ण

# नागपूर मेट्रो रेल फेज-II साठी युटिलिटी शिफ्टिंगला वेगाने गती



महा मेट्रो नागपूरने फेज-II च्या अंमलबजावणीकडे आणखी एक पाऊल टाकले आहे. या प्रकल्पातील बहुतांश ठिकाणी भू-तांत्रिक(जियो टेक्निकल इन्व्हेसटीगेशन) तपासणी पूर्ण झाली आहे आणि सर्व चार ही रिच मध्ये निर्माण कार्य सुरू झाले आहे. यापूर्वी अनेक वेळा सांगितल्याप्रमाणे, फेज-II हा नागपूर मेट्रो रेल प्रकल्प फेज-I चा विस्तार असून, तो शहराच्या चारही दिशांना आहे.

प्रकल्प पूर्णतेतील एक महत्त्वाचा टप्पा म्हणजे - सध्याच्या ठिकाणी असलेले भूमिगत वीज, पाणी, मलनिस्सारण, टेलिकॉम किंवा इतर कोणत्याही पुरवठा लाईन्सचे स्थलांतर किंवा युटिलिटी शिफ्टिंग, म्हणजेच या लाईन्सना नवीन ठिकाणी हलवणे आवश्यक होते, कारण प्रकल्पाच्या अंमलबजावणीदरम्यान कोणतीही अडचण टाळण्यासाठी आणि नुकसान होऊ नये म्हणून हे काम महत्त्वाचे आहे.

या युटिलिटी शिफ्टिंगचा भाग म्हणून, महामेट्रो नागपूरने अलीकडेच रीच 2 – कामठी रोडवरील मेट्रो अलाईनमेंटला ओलांडणाऱ्या 400 आणि 132 केव्ही ईएचव्ही लाईन्सचे उंची वाढवण्याचे काम यशस्वीरित्या पूर्ण केले. हे काम महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी लिमिटेड (MSETCL) नागपूर आणि मुख्यालय मुंबई यांच्या सल्लामसलतीने करण्यात आले.

या प्रक्रियेला डिझाईन ड्रॉईंग मंजुरीने सुरुवात झाली, जी नागपूर व महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी लिमिटेड (MSETCL) मुख्यालय, मुंबई येथे मंजूर करण्यात आली. त्यानंतर विद्युत खांबाचे उत्पादन, त्यांची वाहतूक आणि कार्थस्थळी मोनोपोलच्या उभारणीचे काम झाले. तीन मोनोपोल्सची उभारणी आणि महामार्ग ओलांडून कंडक्टर स्ट्रिंगिंगचे काम पूर्ण करण्यात आले.

हे संपूर्ण काम केवळ ६ दिवसांच्या पॉवर ब्लॉकमध्ये पूर्ण करण्यात आले. महामेट्रोच्या टीमने प्रत्येक ठिकाणी तीन मोनोपोल उभे केले, कंडक्टर स्ट्रिंगिंग आणि 400 केव्ही/132 केव्ही सर्किटला वीजपुरवठा देऊन यशस्वीपणे कमीशनिंग केले. त्यानंतर जुन्या लॅटिस टॉवर्स (लॅटिस टॉवर म्हणजे एक उभा उभारलेला जाळीचा ढाचा, जो पारेषण क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर वापरला जातो) चे विस्थापन करण्यात आले.

या उंची वाढवण्याच्या यशस्वी आणि वेळेत पूर्ण झालेल्या कामामुळे फेज-II च्या कामाला अधिक वेग मिळणार आहे. महामेट्रो नागपूर, महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी लिमिटेडच्या (MSETCL) वरिष्ठ अधिकाऱ्यांचे त्यांच्या अमूल्य मार्गदर्शन व सहकार्याबद्दल मन:पूर्वक आभार मानते.